28 JULY FRONT PAGE_Layout 1 7/28/2026 4:56 PM Page 1

सायंदैनिक

# गुड इव्हिनिंग City

goodeveningcity@gmail.com www.goodeveningcity.com

२८ जुलै २०२६, मंगळवार | वर्ष १५ वे | अंक १०३ | पृष्ठे ६

संत गजानन अर्बन निधी लि. बुलढाणा
रजि नं U65990MH2019PLC319142
हरिकृपा शॉपिंग कॉम्प्लेक्स, जयस्तंभ चौक, बुलढाणा-443001

पाहिजेत
खालील पदे त्वरित भरावयाचे आहेत.

| पद | पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|
| डेव्हलपमेंट ऑफिसर | पदवीधर तथा अनुभव | 1 |
| लिपिक | पदवीधर | 5 |
| महावार ठेव प्रतिनिधी | १२ वी पास | 5 |
| मुदत ठेव प्रतिनिधी | १२ वी पास | 5 |

शुक्रवार दिनांक 31/07/2026 रोजी | वेळ दुपारी 12 ते 4
मुलाखतीचे ठिकाण - संत गजानन अर्बन निधी लि., बुलढाणा
हरिकृपा शॉपिंग कॉम्प्लेक्स, जयस्तंभ चौक, बुलढाणा
संपर्क :- 8180014150

# अल्पवयीन आंदोलकांना ताबडतोब मुक्त करा!

## सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश : गरजेपेक्षा जास्त बळाचा वापर करणाऱ्यांवर कारवाई होईल



**नवी दिल्ली, २८ जुलै (वृत्तसंस्था) :** विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या कारवाईबाबतच्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेतली. विद्यार्थ्यांचे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण होते आणि आंदोलन करणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. ज्यांनी अति-बळाचा वापर केला, त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, १८ वर्षांखालील आणि कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या आंदोलकांची त्वरित सुटका करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले.



न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, प्रथमदर्शनी पाहता स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीची गरज असल्याचे दिसून येते. पोलीस कारवाईबाबतच्या विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुधारणा करण्याची वेळ आली आहे, असे न्यायालयाने नमूद केले. तसेच, २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या नियमांची सध्याची परिणामकारकता तपासण्यासाठी त्यांचा आढावा घेण्याचेही न्यायालयाने सुचवले, जेणेकरून आंदोलन सुरू होताच पोलिसांच्या प्रस्थापित कार्यपद्धतींची (प्रोटोकॉल्सची) त्वरित अंमलबजावणी सुनिश्चित करता येईल.

सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार असला तरी, कायदा मोडणाऱ्यांना शिक्षेला सामोरे जावे लागेल. त्यांनी माहिती दिली की, या घटनेत २५० हून अधिक पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. यावर न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, स्वतंत्र चौकशीमुळे आंदोलक आणि पोलीस या दोघांनीही केलेल्या आरोपांची निष्पक्षपणे तपासणी करणे शक्य होईल. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ ऑगस्ट रोजी होणार आहे.

राजलक्ष्मी अर्बन
महिला को-ऑप. क्रेडिट सोसा. लि. बुलडाणा र.नं.४२६
पत्ता : वसंत प्लाझा कॉम्प्लेक्स, चिखली रोड, वृंदावन नगर पाटीजवळ, बुलढाणा

पाहिजेत
वरील पतसंस्थेमध्ये बुलढाणा शाखेसाठी खालील पदावर कर्मचारी नियुक्त करणे आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | जागा |
|---|---|---|---|
| १ | शाखा व्यवस्थापक | पदविधर तसेच अनुभवीस प्राधान्य | १ |
| २ | लिपीक / कॅशिअर | १२, पदविधर तसेच अनुभवीस प्राधान्य | २ |
| ३ | शिपाई | १० वी किंवा १२ वी किंवा पदवीधर | १ |
| ४ | अल्पबचत प्रतिनिधी | १० वी किंवा १२ वी किंवा पदवीधर | २ |

मुलाखतीसाठी उमेदवारांनी मंगळवार दि. २८/०७/२०२६ रोजी वेळ २ ते ४ दरम्यान संस्थेच्या पत्यावर बायोडाटा सह उपस्थित रहावे.

सौ. वैशाली युवराज वाघ, अध्यक्षा, मो. ९४२२९६०४११
सौ. अर्चना दिपक टेकाळे, सचिव, मो. ८९७५८०४८३७
सौ. मनिषा सागर राऊत, कोषाध्यक्षा, मो. ९६८९४०७६४७
श्री. अरुण विठ्ठलराव टेकाळे, कार्यकारी संचालक, मो. ९०११५६३४४२

राजलक्ष्मी अर्बन
महिला को-ऑप. क्रेडिट सोसा. लि. बुलडाणा र.नं.४२६
पत्ता : वसंत प्लाझा कॉम्प्लेक्स, चिखली रोड, वृंदावन नगर पाटीजवळ, बुलढाणा

# डॉ.राजेंद्र शिंगणे जिल्हा बँकेवर बिनविरोध



**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेच्या संचालक पदी डॉ. राजेंद्र शिंगणे यांची बिनविरोध निवड झाली आहे. तब्बल १८ वर्षांनंतर जिल्हा बँकचे पहिले खाते राज्याचे माजी मंत्री डॉ. शिंगणे यांनी उघडले आहे. अर्ज छाननी नंतर ब प्राथमिक कृषी पतसंस्था सिंदखेड राजा तालुक्या मधून डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे हे बिनविरोध निवडून आले असून दत्तात्रय विनायकराव देशमुख यांच्या अर्ज माघारी नंतर डॉक्टर राजेंद्र शिंगणे विजय घोषित करण्यात आले आहे. परंतु डॉ. राजेंद्र शिंगणे यांचे सहकारात महत्त्वाचे योगदान राहिले आहे. राज्याचे सहकार नेते म्हणून डॉ. राजेंद्र शिंगणे यांची ओळख आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीकडे जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले होते. परंतु आज डॉ. राजेंद्र शिंगणे बिनविरोध निवड झाली आहे. परंतु आता बाकीच्या संचालकांसाठी कशा पद्धतीने निवडणूक प्रक्रिया पार पडते ते बघावं लागेल. पण सर्वात महत्वाचे पॅनल महाविकास आघाडी आणि महायुतीचे होईल किंवा वेगळी आघाडी अस्तित्वात येईल हे येणाऱ्या कालावधीत स्पष्ट होईल. अर्ज मागे घेण्यासाठी बराच मोठा कालावधी दिला असल्यामुळे अजून घोडे मैदान दुर आहे. संचालक पदांसाठी २३ ऑगस्ट रोजी मतदान होणार असून, २४ ऑगस्ट रोजी मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे. छाननी व माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १२ ऑगस्ट रोजी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करून निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे.

# गुलाबराव पाटलांच्या विधानावरून नवा वाद

## उद्योजकांना विजेचा तुटवडा नको, रोहिणी खडसेंची सडकून टीका

**जळगाव , २८ जुलै (वृत्तसंस्था) :** एकवेळेस शेतकऱ्यांना लोडशेडिंगचा थोडा त्रास झाला तरी आम्ही सहन करू, पण उद्योजकांना विजेचा तुटवडा होता कामा नये, असे वादग्रस्त विधान राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आणि जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. जळगावमधील एका वीज प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यात बोलताना त्यांनी हे विधान केले असून, यावरून आता राजकीय वाद उफाळून आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) नेत्या रोहिणी खडसे यांनी या विधानावरून गुलाबराव पाटील आणि महायुती सरकारवर सडकून टीका केली आहे.

जळगाव येथील अतिरिक्त वीज ट्रान्सफॉर्मरच्या (५ एमव्हीए) लोकार्पण सोहळ्यात बोलताना गुलाबराव पाटील यांनी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना आणि उपस्थित उद्योजकांना संबोधित केले. उद्योजकांची बाजू मांडताना ते म्हणाले की, आमची हात जोडून विनंती आहे की, एकवेळेस शेतकऱ्यांना थोडा त्रास झाला तरी आम्ही सहन करून घेऊ, पण उद्योजकांना त्रास होऊ देऊ नका. कारण उद्योजकाला मजुरांना पैसे द्यायचे असतात. लाईट गेली म्हणून तो मजुरांना पैसे नाकारू शकत नाही. त्यात त्याचा प्रोडक्शनचा मोठा लॉस होतो. जर सतत लाईट जात असेल, तर नवीन उद्योजक इथे कारखाने टाकण्यास तयार होणार नाहीत. या उद्योगांमुळेच आमच्या परिसरातील ५००-१००० मुलांना किमान रोजगार मिळतो, असेही त्यांनी यावेळी सांगीतले.



# तणनाशकांचा वाढत्या वापराने रानभाज्यांचे अस्तित्व धोक्यात

## शहरी भागात मागणी वाढली असली तरी भाज्यांचा अभाव



**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** पावसाळा सुरू होताच शेतांच्या धावर, डोंगरकड्यांवर, जंगल परिसरात णि माळरानावर नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या विध रानभाज्या ग्रामीण जीवनाचा आणि परिक आहाराचा अविभाज्य भाग मानल्या तात. पोषक आणि औषधी गुणधर्मांनी वृद्ध असलेल्या या रानभाज्यांना ग्रामीण गाबरोबरच शहरांमध्येही मोठी मागणी सते. मात्र यंदा पावसाने ओढ दिल्याने णि शेतीमध्ये तणनाशकांचा वाढता वापर त्यामुळे बुलढाणा तालुक्यासह परिसरात भाज्यांचा मोठ्या प्रमाणावर अभाव जाणवत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांमध्ये वसाळ्यात रानभाज्यांचा आह–ारात वर्जून समावेश केला जातो. या भाज्यांमध्ये सायनिक फवारणी नसल्याने त्या अधिक क्षित आणि आरोग्यदायी मानल्या जातात. मुळे आजच्या काळातही अनेक नागरिक बाजारातील फवारणी केलेल्या भाज्यांपेक्षा नैसर्गिक रानभाज्यांना अधिक पसंती देतात. मात्र यंदाच्या अपुऱ्या पावसामुळे रानभाज्यांची वाढच मर्यादित राहिल्याने नागरिकांची निराशा झाली आहे. तालुक्यातील शेतकरी वर्षभर विविध गावरान व संकरित भाजीपाल्याचे उत्पादन घेत असले तरी त्या पिकांवर कीड व रोगांपासून संरक्षणासाठी विविध किटकनाशके आणि रासायनिक औषधांची फवारणी केली जाते. अशा भाज्यांच्या नियमित सेवनामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या रानभाज्यांकडे नागरिकांचा कल वाढत आहे.

मुबलक पाऊस झाल्यानंतर शेतांच्या बांधावर, जंगल परिसरात आणि माळरानावर रानकांदा, टेकुळी (भुईछत्री), करटुली, रानकेळी, रानभोपळा, पुदिना, वाघेटी, चवळी, लहान व मोठा घोळ, पात्रा, रानकारले, अंबाडी, तांदुळकुंजरा अशा अनेक प्रकारच्या रानभाज्या मोठ्या प्रमाणात उगवतात. या भाज्या लोह, जीवनसत्त्वे, तंतुमय पदार्थ आणि विविध सूक्ष्म पोषक घटकांनी समृद्ध असल्याने त्य शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास अशक्तपणा कमी करण्यास, पचनक्रिय सुधारण्यास, त्वचारोगांपासून संरक्षण करण्यास तसेच पित्ताच्या तक्रारी कमी करण्यास उपयुक्त असल्याचे जाणकार सांगतात. पूर्वी शेतकरी बैलांच्या साहाय्याने मशागत करून पिकांची खुरपणी–कोळपणी करत असत. त्यामुळे शेतातील तणांबरोबरच अनेक प्रकारच्या रानभाज्या नैसर्गिकरित्या वाढत असत आणि पावसाळ्यात त्या घराघरांत आवडीने खाल्ल्या जात. मात्र कालांतराने तणनाशकांचा वापर वाढल्याने तणांसोबत रानभाज्याही नष्ट होऊ लागल्या. या रानभाज्यांची ओळख आता नवीन पिढीला कमी होत चालली आहे. पूर्वीच्या पिढीतील शेतकरी विविध रानभाज्या सहज ओळखून त्यांचा आहारात वापर करत असत. आज बदलत्या जीवनशैलीमुळे आणि आधुनिक शेतीमुळे ही पारंपरिक माहिती हळूहळू लोप पावत असल्याची खंत ज्येष्ठ नागरिक व्यक्त करतात.

### जैवविविधतेवर परिणाम

*शेतीतील यांत्रिकीकरणामुळे पेरणी, मशागत, आंतरमशागत आणि काढणीची कामे कमी वेळात आणि कमी खर्चात होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न यशस्वी होत असले तरी तणनाशकांचा वाढता वापर आणि रासायनिक शेतीमुळे नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या रानभाज्या आणि इतर उपयुक्त वनस्पतींचे अस्तित्व धोक्यात आले आहे.*

– **गणेश गवई**, शेतकरी


## एकता नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बुलडाणा रजि.नं.३१९

स्थापना–१९९३

### पाहिजेत

एकता नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बुलढाणा शाखा-बुलढाणा करिता कंत्राटी/ करार पद्धतीने एकत्रित मानधन तत्वावर खालील पदे भरावयाची आहे.

| पद | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | वेतन व इतर भत्ते |
|---|---|---|---|
| व्यवस्थापक | ०१ (पुरुष) | वाणिज्य शाखेचा पदवीधर तसेच पतसंस्था किंवा बँकेतून सेवानिवृत्त असल्यास प्राधान्य | वेतन हे शैक्षणिक पात्रता व अनुभव त्यांच्या आधारे ठरविण्यात येईल. |
| लिपिक | ०६ (३ पुरुष, ३ महिला) | कोणत्याही शाखेचा पदवीधर तसेच अनुभव असल्यास प्राधान्य | |
| शिपाई | ०२ (पुरुष) | किमान दहावी उत्तीर्ण | |

वरील प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित व मूळ प्रति सह दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोज रविवारला सकाळी ११ वाजता खालील पत्त्यावर प्रत्यक्ष हजर राहावे. वरील भरती प्रक्रिये संदर्भात सर्व अधिकार संस्थेने राखून ठेवले आहेत.

**पत्ता :** एकता नागरी सहकारी पतसंस्था मर्या- बुलढाणा (मुख्यालय) गजानन महाराज मंदिर चौक, विष्णूवाडी, बुलढाणा.

मो.९८२२४७२२४७,९५९५२८५६११.

अध्यक्ष श्री.निलेश द.तायडे | उपाध्यक्ष श्री.रामेश्वर अं. बांबल | सचिव श्री.सुरेश भ.तायडे


# प्रवाश्यांच्या समस्या व तक्रार निराकरणासाठी प्रवासी राजा व कामगार पालक दिनाचे आयोजन

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम

**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत प्रवासी राजा दिन व दुपारी ३ ते ५ या वेळेत कामगार पालक दिन आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाच्या कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा–महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तत्काळ निराकरण करतील.

बुलढाणा विभागातील बुलढाणा आगार येथे दि.२९.जुले ,चिखली आगार येथे दि. ५ ऑगस्ट, खामगाव आगार येथे दि. १२ ऑगस्ट, मेहकर आगार येथे दि. १९ ऑगस्ट , मलकापुर येथे दि. २ सप्टेंबर, जळगाव जामोद येथे दि. ९ सप्टेंबर व शेगांव आगार येथे दि. १६ सप्टेंबर रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील एसटी बर प्रवाशी व कामगारांनी या सेवेचा लाभ घेवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

# पीक विमा अर्जासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत

**खामगाव, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२६ साठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै असून, पात्र शेतकऱ्यांनी मुदत संपण्यापूर्वी अर्ज दाखल करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, दुष्काळ तसेच कीड–रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळावे, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे प्रशासनाने म्हटले आहे.

अर्जासाठी ७/१२ व ८–अ उतारा, आधार कार्ड, आधारशी संलग्न बँक खाते, पेरणी घोषणापत्र अथवा पिकाची माहिती आवश्यक असून डिजिटल पीक सर्वेक्षणात नोंदणी केलेली असणे बंधनकारक असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

# 'मोबाईलप्रेमी शिक्षिका' अन् विस्कटलेली रोहणा 'जिल्हा परिषद शाळा'!

## संतप्त पालकांसह विद्यार्थ्यांचा गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात टाहो

**खामगांव, २५ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील रो–हणा जिल्हा परिषद शाळेवर आधीच ५ पैकी ४ शिक्षक आधीच त्यात १ कमी आणि नव्याने सहा महिन्यापासून रुजू झालेल्या शिक्षिका व्यवहारे विध्यार्थ्यांना न शिकविता फक्त मोबाईल मध्ये गुंग असतात.परिणामी इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांनची शैक्षणिक प्रगती थांबली आहे. मोबाईल प्रेमी शिक्षकेवर कारवाई करा. तसेच शाळेतील रिक्त पदे भरा यासाठी रोहणा येथील संतप्त पालकांसह विद्यार्थ्यांनी गटविकास अधिकारी देशमुख यांच्या दालनात एकच टाहो फोडत दालनासमोर शाळेचा वर्ग भरवीला.



निवेदनात शाळा व्यवस्थापन समिती, रोहणा ग्रा. पं. सरपंच व ग्रामस्थांनी शाळेला दिलेली शिक्षिका बदलून दयावी. व रिक्त असलेली शिक्षक संख्या ताबडतोब भरण्यात यावी अन्यथा आठ दिवसानंतर शाळेला कुलूप ठोकण्याचा इशाराही दिला आहे.

गोरगरिबांच्या मुलांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात येऊ नये यासाठी आपण प्रयत्न करावे अशी मागणी ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी देशमुख गटशिक्षणाधिकारी गायकवाड यांना केली. याकडे तातडीने लक्ष देऊ असे आश्वासन गटविकास अधिकारी देशमुख यांनी विद्यार्थी व पालकांना दिले. निवेदनावर सरपंच सविता गव्ह–ाळे, उपसरपंच यशोदा खंडारे, ज्योती खंडारे, अंजली बोचरे, प्रल्हाद देशमूख, श्याम कुटे, संदीप घोंगे, गोपाल बोचरे, रवी पाटोले, सागर सावंग, रवी सावंग, सुरेश पाटोळे, माला सावंग यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

**मा. न्यायाधीश सहकार न्यायालय अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. १२३/२०२६ ने. ता. १३/०८/२०२६

**वादी :** शिवसाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बुलढाणा

विरुद्ध

**प्रतिवादी :** सुरेन्द्र पुंडलीक जाधव व इतर

प्रतिवादी क्र. २) संजय साहेबराव कदम रा. धोत्रा नंदी पो. सारंवा ता. चिखली जि. बुलढाणा
क्र. ३) दशरथ बापु प्रधान रा. शाहू नगर, पंचमुखी मंदीराजवळ, चिखली ता. चिखली जि. बुलढाणा

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुद्ध कर्ज रक्कम रु. ९,६५,६४३/– वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा पाव देण्यासाठी दि. १३ माहे ऑगष्ट, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या व्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची/वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. ०९ माहे जुलै, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

न्यायालयीन लिपीक, सहकार न्यायालय, अकोला


# कापड दुकानाजवळून दुचाकीची चोरी

**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** एका कापड दुकानाजवळ उभी केलेली सुमारे ४० हजार रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २५ जुलै रोजी सायंकाळी घडली. दत्तपूर येथील कैलास दिक्षण फुलझाडे (वय ४२) यांनी पत्नीला कामावरून घेण्यासाठी येताना त्यांची होंडा शाईन (एमएच–२८–बीसी–६७७९) ही दुचाकी दुकानाशेजारी उभी केली होती. दुकानातील काम आटोपून बाहेर आल्यानंतर दुचाकी जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही वाहनाचा मागोवा न लागल्याने चोरी झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना: पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण १००% मोफत

**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा लाभ जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना जलदगतीने मिळावा, यासाठी प्रशासनाने वेगाने पावले उचलली आहेत. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, शेतकऱ्यांनी आपला 'ॲग्रीस्टॅक' क्रमांक सोबत घेऊन जवळच्या महा–ई–सेवा किंवा सीएससी केंद्रांवर जाऊन आपले आधार प्रमाणीकरण (ई–केवायसी) त्वरित पूर्ण करावे. ही संपूर्ण प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी १००% मोफत असून, योजनेचे काम विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे यांनी दिले आहेत.

ही पहिली यादी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, तलाठी कार्यालये, विकास सोसायट्या आणि बँकांच्या शाखांमध्ये सर्वांना दिसेल अशी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांची नावे या पहिल्या यादीत नाहीत, त्यांनी अजिबात काळजी करू नये, त्यांची नावे पुढील यादीत नक्की येतील, अशी ग्वाही जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाण यांनी दिली आहे. यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी आपले बँक खाते व




कर्जमाफीची रक्कम तपासून मोफत आधार प्रमाणीकरण करावे. ई–सेवा केंद्र चालकांना शासनाकडून मोबदला मिळणार असल्याने शेतकऱ्यांनी त्यांना कोणतेही शुल्क देऊ नये, असे आदेश प्रशासनाने दिले आहेत. तसेच, माहितीत काही चूक वाटल्यास शेतकऱ्यांनी थेट पोर्टलवर तक्रार नोंदवावी, प्रशासकीय समिती ती तत्–परतेने सोडवून न्याय देईल.

शेतकऱ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. ज्या गावांमध्ये सध्या एकही आधार प्रमाणीकरण केंद्र नाही, तेथे तातडीने नवीन केंद्रे सुरू करण्याच्या आणि ग्रामपंचायतींमधील बंद असलेली केंद्रे तत्काळ कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांनी या मोफत व सोप्या सुविधेचा लाभ घ्यावा, जेणेकरून कर्जमाफीचा मार्ग लवकर मोकळा होईल. योजनेच्या प्रभावी अंमलबजा–वणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कवळे, जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाण, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, संजय खडसे (सिंदखेड राजा), रवींद्र जोगी (मेहकर), अग्रणी बँक व्यवस्थापक शैलेंद्र सिंह, महा आयटीचे प्रसन्न बोरकर आणि बीडीसीसीचे आर.टी. मस्के प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच, दृक्श्राव्य प्रणालीद्वारे (व्हीसी) जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सहायक निबंधक व तालुका कृषी अधिकारी जोडले गेले होते. प्रशासनाच्या सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून ही योजना यशस्वी करण्याचे आवाहन या बैठकीत करण्यात आले.

# ऑनलाइन क्रीडा स्पर्धा सॉफ्टवेअरचे ३ ऑगस्टला प्रशिक्षण

**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्ह्यातील विविध एकविध खेळ संघटनांच्या तांत्रिक सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन सॉफ्टवेअर हाताळ–णीचे प्रशिक्षण सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरून रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आले आहे. सन २०२६–२७ या शैक्षणिक सत्रात तालुकास्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत होणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धांसाठी प्रवेश अर्ज ऑनलाइन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून स्वीकारले जाणार आहेत. या सॉफ्टवेअरची प्रभावी हाताळणी, स्पर्धांचे नियोजन आणि आयोजन सुलभ व्हावे, यासाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणाचे दोन सत्रांमध्ये आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत मोताळा, मलकापूर, खामगाव, शेगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद आणि नांदुरा तालुक्यातील शिक्षक व प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण होणार आहे. तर दुपारी २ ते सायंकाळी ४ या वेळेत सिंदखेड राजा, मेहकर, लोणार, चिखली, देऊळगाव राजा आणि बुलढाणा तालुक्यातील सहभागींसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

# बिझनेस

## एक मच्छर साला...

## मच्छरांना पळवून लावण्याच्या नादात भारतीयांनी फुकले 3,788 कोटी रुपये!

### कंपन्यांचा व्यवसाय वाढतोय वेगाने...

भारतात तापमान वाढत असताना डासांची संख्याही वाढली आहे. डासांच्या चाव्यामुळे होणारे आजार टाळण्यासाठी लोक विविध उत्पादने वापरत आहेत. यामुळे भारतातील डास प्रतिबंधक बाजारपेठेच्या जलद वाढीला चालना मिळत आहे. Grand View Research & Horizon Databook च्या ताज्या अहवालानुसार, २०२५ मध्ये भारतातील डास प्रतिबंधक उत्पादनांची एकूण उलाढाल अंदाजे ४०२ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ३७८८ कोटी रुपये) आहे. ही वाढ आणखी होण्याची अपेक्षा आहे.



## गल्लीतल्या दुकानामुळे सुचली कल्पना!

# व्यवसायासाठी 30 लाखांची नोकरी सोडली, आता करोडोंचे लक्ष्य...

**गुंजन परमार हे गुजरातच्या सुरेंद्रनगरचे रहिवासी आहेत. त्यांनी अगदी कमी वेळात 'द लॉन्ड्री पोस्ट' नावाचा एक यशस्वी स्टार्टअप उभा केला आहे. परिसरातील एका साध्या लॉन्ड्री दुकानाची आर्थिक क्षमता पाहून त्यांना ही कल्पना सुचली. यानंतर, त्यांनी वर्षाला ३० लाख रुपये कमावणारी आपली कॉर्पोरेट नोकरी सोडली. हा एक तंत्रज्ञानावर आधारित लॉन्ड्री आणि फॅब्रिक केअर ब्रँड आहे. जो लॉन्ड्री, ड्राय क्लीनिंग, इस्त्री करणे आणि घरातील कापड (जसे की पडदे, सोफा कव्हर्स इत्यादी) स्वच्छ करणे यांसारख्या सेवा देतो. आज हा व्यवसाय अहमदाबादस्थित ब्रँड एक जीवनशैली सेवा बनला आहे. २०२६ च्या अखेरपर्यंत ११.५ कोटींचा महसूल मिळवण्याचे त्याचे लक्ष्य आहे. गुंजन परमार यांच्या यशाच्या प्रवासाबद्दल जाणून घेऊया...**






## मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म

गुंजन परमार यांचा जन्म गुजरातच्या सुरेंद्रनगर येथील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील एका बेअरिंग फॅक्टरीमध्ये मेकॅनिकल इंजिनिअर होते आणि त्यांची आई गृहिणी होती. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर गुंजन उच्च शिक्षणासाठी अहमदाबादला गेले. त्यांनी गुजरात विद्यापीठात इंटिग्रेटेड एमबीए प्रोग्राममध्ये प्रवेश घेतला. मार्केटिंगमध्ये सुवर्णपदक मिळवून पदवी प्राप्त केली. एक काळ असा होता की त्यांच्या आई- वडिलांकडे त्यांची कॉलेज फी भरण्यासाठी १५,००० रुपये सुद्धा नव्हते. त्यामुळे त्यांना नातेवाईकांकडून पैसे उधार घ्यावे लागले. २०१५ मध्ये शिक्षण पूर्ण झाल्यावर गुंजन एशियन पेंट्समध्ये टेरिटरी सेल्स एक्झिक्युटिव्ह म्हणून रुजू झाले. पुढील दहा वर्षांत त्यांनी कॉर्पोरेट क्षेत्रात सातत्याने प्रगती केली आणि ते कंपनीच्या सर्वात तरुण व्यवस्थापकांपैकी एक बनले. त्यांनी कंपनी सोडली तेव्हापर्यंत त्यांचा वार्षिक पगार जवळपास ३० लाख रुपयांपर्यंत वाढला होता.

## ग्राहकांच्या भावनांकडे लक्ष

गुंजन परमार यांचा विश्वास आहे की कपडे म्हणजे केवळ कापड नाही. त्याऐवजी, त्या आठवणी आणि आत्मविश्वास आहेत. एकदा जेव्हा त्यांनी एका ग्राहकाच्या वडिलांच्या जुन्या ब्लेझरवरील शाईचे हट्टी डाग काढले, तेव्हा तो ग्राहक भावूक झाला. हेच या ब्रँडचे खरे यश आहे. याव्यतिरिक्त हा ब्रँड पर्यावरणाचीही विशेष काळजी घेतो. कंपनीची मशिन्स २०% कमी पाणी वापरतात. गुंजन पर्यावरणपूरक रसायने वापरतात. ग्राहकांना लागवड करण्यायोग्य टॅग्ज (बीज टॅग्ज) देणे हा त्यांच्या शाश्वत मॉडेलचा एक महत्त्वाचा भाग आहे.



गुड इव्हिनिंग City

# निरामय



# सूज





## संकेत ओळखा!

**महिला या आरोग्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करतात हे अनेक सर्वेक्षणातून समोर आले आहे. डॉक्टरांकडे जाण्याचा कंटाळा, पैसे वाचवण्यासाठीची धडपड यामुळे महिला या डॉक्टरांकडे जाणे टाळतात. पण काही लहान लहान संकेत मोठ्या आजारांना आमंत्रण देऊ शकतात. आरोग्यासंदर्भात तुम्हाला काही तक्रारी जाणवत असतील तर तुम्ही या संकेतांकडे मुळीच दुर्लक्ष करायला नको. जर तुम्हालाही काही त्रास होत असतील तर तुम्ही याकडे दुर्लक्ष करू नका.**

- वजन वाढणे किंवा कमी होणे : फिटनेस हा हल्ली सगळ्याच महिलांच्या आवडीचा विषय आहे. त्यामुळे वजन कमी करणे खूप महिलांसाठी फार महत्वाचे असते. हल्ली पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला व्यायाम करताना दिसतात. पण कधी कधी काहीही न करता महिलांचे वजन हे अचानक वाढू किंवा कमी होऊ लागते. तुमचेही वजन असे अचानक कमी आणि जास्त होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. कारण वजन वाढ आणि कमी होणे हे काही खास आजारांचे लक्षण आहे. मधुमेह, हार्मोन्समध्ये बदल, थायरॉईड या त्रासामुळे देखील असे वजन वाढू आणि कमी होऊ शकते.
- तोंड सतत सुकणे : महिलांनाच नाही तर कोणालाही असा त्रास होऊ शकतो. खूप जणांना तोंड सुकण्याचा त्रास होतो. सतत तोंड सुकणे हे शरीरातील काही कमतरता दाखवत असतात. तोंड सतत सुकत असेल आणि तोंडात नैसर्गिक लाळ तयार होत नसेल तर तुमच्या शरीरात व्हिटॅमिन्सची कमतरता असण्याची शक्यता आहे. यावर काही चाचण्या करुन योग्य सल्ला घेण्याची गरज असते. त्यामुळे तुम्ही तोंड सुकत असेल तर तातडीने डॉक्टरकडे जा आणि आरोग्याची योग्य काळजी घ्या. तुम्हाला काही गोळ्या दिल्यामुळे हा त्रास कमी होण्यास मदत मिळू शकतो.
- केस गळणे : केस गळणे हे महिलांसाठी अगदी सर्वसामान्य आहे. पण केसांची गळती जास्त होत असेल तर आरोग्यविषयक काही तक्रारी उद्भवण्याची शक्यता ही नक्कीच जास्त असते. केस गळणे हे शरीरातील काही गोष्टींची कमतरता दाखवते. त्यामुळे केस गळतीचे प्रमाण खूप वाढले असेल तर याचे कारण व्हिटॅमिन्सची कमतरता, चुकीचा आहार किंवा कमी आहार यामुळे देखील केस गळू शकतात. त्यामुळे केसांना चाई पडण्याची शक्यता असते. केस गळतीचे प्रमाण जास्त होत असेल तर तुम्ही आरोग्याची काळजी घ्यायला हवी.

## हाता-पायावर...

**मधुमेह हा एक दिवसेंदिवस वाढत जाणारा एक जीवनशैली विकार आहे. ज्यामुळे मधुमेहींचे प्रमाण सध्या देशात वाढताना दिसू लागले आहे. आजकाल प्रत्येक घरात एकतरी मधुमेही असतोच. जर मधुमेहापासून वेळीच स्वतःचे रक्षण करायचे असेल तर मधुमेहाची लक्षणं प्रत्येकाला माहीत असायला हवीत. वास्तविक मधुमेह होण्यामागची कारणं जशी वेगवेगळी असतात. तशीच प्रत्येकाची मधुमेहाची लक्षणंही वेगळी असू शकतात. यासाठीच जर तुम्हाला सतत हातापायाला सूज येत असेल तर हे मधुमेह असण्याचं एक गंभीर लक्षण असू शकतं हे ओळखा. कारण हातापायाला सूज येण्याची कारणं इतरही असली तरी ते मधुमेहाचेही एक गंभीर लक्षण आहे. यासाठीच ओळखा तुमच्या शरीराचे संकेत आणि वेळीच घ्या काळजी...**



### हे आहे मधुमेहाचे महत्त्वाचे लक्षण...

मधुमेहाचे एक प्रमुख लक्षण म्हणजे सतत हातापायाला सूज येणे अथवा खाज येणे. हातापायाला सूज येणं हे मधुमेहाचे प्राथमिक लक्षण असू शकते. ज्यावरून तुम्हाला मधुमेह झाल्याचा संकेत मिळतो. शरीरात पाण्याचे प्रमाण वाढल्यामुळे तुमच्या हातापायाला सूज येण्याची शक्यता असते. यासोबतच वारंवार लघवीला होणं, सतत लहान लागणं, वजन वाढणं, धुरकट दिसणं, अंगात उष्णता वाढणं, गोड खाण्याची तीव्र इच्छा होणं ही मधुमेहाची प्राथमिक लक्षणं असू शकतात. असं असल्यास आपलं शरीर मधुमेहाचे संकेत देत असून आता आपण स्वतःच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्याची गरज आहे हे ओळखा.

### काय आहे तज्ञांचे मत...

मधुमेह टाईप 1 आणि टाईप 2 अशा दोन प्रकारचा असतो. त्यामुळे मधुमेह होण्याची लक्षणे काही वर्षे आधी पासूनच शरीरात दिसू लागतात. ज्याला प्री डायबेटिक लक्षणं असं म्हणतात. सहाजिकच मधुमेहाची लक्षणं सामान्य असू शकतात तसंच मधुमेह वाढताच ती तीव्र आणि गंभीर रूप धारण करू शकतात. प्री डायबेटिक अवस्थेत जर तुम्हाला मधुमेह होण्याचे संकेत मिळाले तर त्यावर वेळीच उपचार करून मधुमेह नियंत्रित करता येतो. यासाठी दर वर्षी नियमित हेल्थ चेकअप करा आणि जीवनशैली आणि आहारात बदल करून आरोग्य राखा असा आरोग्य तज्ञ नेहमी सल्ला देतात.



## डोळ्यांवर...

**डोळे सुंदर आणि आकर्षक दिसावे असे सगळ्यांना वाटते. पण अपुरी झोप आणि सतत मोबाईलच्या वापरामुळे हल्ली खूप जणांचे डोळे अनाकर्षक झाले आहेत. खूप जणांच्या डोळ्याखाली तर मासांचा जणू गोळाच असल्यासारखा वाटतो. त्यामुळे डोळे हे अजिबात चांगले दिसत नाही. तुमच्याही डोळ्याला अशीच सूज आली असेल तर तुम्हाला काही सोपे उपाय करुन डोळ्यांची सूज घालवता येईल जाणून घेऊया असे काही सोपे उपाय ज्यामुळे डोळे सुंदर दिसतील. या शिवाय डोळ्यांचा पफीनेस घालवण्यासाठी त्वरीत उपायही नक्की करुन पाहा.**

- बर्फाचा शेक : खूप जणांना स्क्रिन टाईम हल्ली चांगलाच वाढलेला आहे. सतत काहीतरी पाहत राहायचे म्हणजे डोळ्यासमोर फोन आलाच. शिवाय कामांसाठी लॅपटॉप आला. नाही म्हटले तरी कामासाठी आपण लॅपटॉपसमोर बसणे अजिबात टाळू शकत नाही. त्यामुळे साहजिकच डोळ्यांना त्रास होण्यास सुरुवात होते. डोळ्यांखाली काळी वर्तुळे येणे आणि त्यानंतर डोळे सुजणे असे त्रास होऊ लागतात. तुम्हालाही असा त्रास होत असेल तर तुम्ही बर्फ एका कापडात बांधून त्याचा छान मसाज करा. डोळ्यांखाली अगदी हळुवार हाताने तुम्हाला हा मसाज करायचा आहे. किमान दोन मिनिटे तुम्ही हा शेक दिल्यामुळे डोळ्यांना चांगला आराम मिळतो. त्यामुळे दिवसातून एकदा तरी तुम्ही हे करा. तुम्हाला नक्कीच फरक झालेला जाणवेल.
- डोळ्यांचा मसाज : डोळ्यांना आलेली सूज ही तुमची अर्धवट झोप आणि तणाव दर्शवते. तणावमुक्त होण्यासाठी तुम्हाला डोळ्यांचा मसाज करणे फारच फायद्याचे ठरते. डोळ्यांचा मसाज करण्यासाठी कोणतेही चांगले मसाज ऑईल घेऊन बोटांच्या साहाय्याने गोलाकार डोळ्यांना मसाज करा. त्यामुळे डोळ्यांखालील सूज कमी होण्यास मदत मिळते. तुम्हाला अगदी शास्त्रशुद्ध पद्धतीने डोळ्यांचा मसाज करायचा असेल तर तुम्हाला युट्युबमध्ये अनेक व्हिडिओ दिसतील हे व्हिडिओ नक्कीच तुम्हाला मदत करतील. डोळ्यांचा अगदी दोन मिनिटे मसाज केल्यामुळेही तुम्हाला खूप आराम मिळेल.



- डोळ्यांचा योगा : डोळ्यांचे आजार आणि माहिती असणे फारच गरजेचे असते. डोळ्यांशी निगडीतही योग असतात. तुम्ही काही व्हिडिओ पाहिलेत तर तुम्हाला डोळ्यांचा योग व्हिडिओ मिळेल. त्यामुळे तुम्हाला डोळ्यांचा अनेक हालचाली दाखवल्या जातात. डोळ्यांचा हा योगा केल्यामुळे नक्कीच तुम्हाला फरक जाणवेल. तुमच्या शरीरात बदल घडवण्यासाठी योग हा थोडा वेळ घेत असला तरी देखील त्याचे परिणाम हे चांगले टिकतात. त्यामुळे तुम्ही अगदी हमखास डोळ्यांचा योग करावा. साधारणपणे डोळ्यांच्या योगमध्ये डोळे मिटणे, डोळ्यांची उघडझाप, डोळे गोलाकार फिरवणे असे प्रकार येतात. त्यामुळे डोळे चांगले राहतात. आता नक्कीच अशापद्धतीने डोळ्यांची काळजी घेतली तर डोळ्यांची सूज कमी होईल आणि डोळे अधिक चांगले दिसण्यास मदत होईल. या शिवाय डोळ्यांची नजर वाढवण्यासाठी उपाय करूनही डोळ्यांची काळजी घेता येईल.

सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City
२८ जुलै २०२६, मंगळवार

# विद्याधर महालेंविरोधात फेसबुक पोस्टप्रकरणी भाजपकडून तक्रार



**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** शासकीय अधिकाऱ्याबाबत फेसबुकवर कथित खोटी, बदनामीकारक आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्याचा आरोप करत भाजपचे बुलढाणा शहराध्यक्ष मंदार भास्करराव बाहेकर यांनी माजी सरपंच मनोज लाहुडकर यांच्याविरोधात बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित पोस्टमुळे शासकीय अधिकाऱ्याची प्रतिमा मलिन होण्याबरोबरच समाजात संभ्रम निर्माण होऊन सार्वजनिक शांततेवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

मंदार बाहेकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, फेसबुकवर प्रसारित करण्यात आलेल्या एका पोस्टमध्ये शासकीय अधिकारी विद्याधर महाले यांच्याविरोधात कोणताही ठोस पुरावा नसताना गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले आहेत. संबंधित माहिती तथ्यहीन, दिशाभूल करणारी आणि बदनामीकारक असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या पोस्टमुळे संबंधित अधिकाऱ्याच्या सार्वजनिक प्रतिमेला धक्का पोहोचण्याबरोबरच नागरिकांमध्ये गैरसमज पसरून सामाजिक वातावरण बिघडण्याची शक्यता असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात भारतीय न्याय संहिता, २०२३ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, संबंधित फेसबुक पोस्ट तातडीने हटविण्यात यावी तसेच पुढील तपास–ासाठी डिजिटल पुरावे जतन करण्यात यावेत, अशी मागणी पोलिसांकडे करण्यात आली आहे. तक्रार दाखल करताना अनेक नागरिकांनी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला. दत्ता पाटील, चंद्रकांत बर्दे, मुन्नाजी बेंडवाल, ॲड. मोहन पवार, ॲड. सुनील देशमुख, नारायणराव हेलगे, सुरेश चौधरी, अंबादास घेवंदे, संजय जुंबड, आनंदा डुकरे, किरण नाईक, मुकुंद देशपांडे, बाळू ठाकरे, मोहम्मद अकील खान, समीर खान, इमान हुसेन, उमेश पाटील, कौस्तुभ उमेश पाटील, अभिषेक वायकोस आणि गणेश गवळी आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी माध्यमांशी बोलताना मंदार बाहेकर यांनी सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने होणे आवश्यक असल्याचे सांगितले. कोणत्याही व्यक्तीविषयी विनाकारण बदनामीकारक मजकूर प्रसारित करणे, खोटी माहिती पसरविणे अथवा समाजात द्वेषाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे गंभीर स्वरूपाचे कृत्य असून, अशा प्रकारांना कायद्याच्या चौकटीत आळा बसणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, या प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्याची नोंद पोलिसांनी घेतली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. तक्रारीतील आरोपांवर संबंधित मनोज लाहुडकर यांची भूमिका अथवा प्रतिक्रिया वृत्त लिहिपर्यंत उपलब्ध होऊ शकलेली नव्हती.

# व्यसनांपासून परावृत्ती जबाबदार नागरिक घडविते : एसपी निलेश तांबे

## चिखली येथे मिशन परिवर्तन रनिंग स्पर्धा उत्साहात



**चिखली, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** प्रेस बुलढाणा जिल्हा नशामुक्त करण्यासाठी तरूणांमध्ये सकारात्मक विचारणीचे अभिसरण करण्याच्या अनुषंगाने जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांनी मिशन परिवर्तनची सुरुवात केली. विशेष म्हणजे श्री तांबे यांनी मिशन परिवर्तनची व्यापकता वाढविली असून याअंतर्गत आता मोठ्या प्रमाणावर सर्वत्र कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. चिखली येथे आज सकाळी व्यसनमुक्ती, निरोगी जीवनशैली व समाज–पोलीस मैत्रीचा संदेश देण्यासाठी रनिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एसपी श्री तांबे स्वतः धावले.. स्पर्धकांचा उत्साह वाढविला आणि उपस्थितांना त्यांनी मार्गदर्शनही केले.

स्पर्धक तसेच श्री शिवाजी सिनियर कॉलेज, चिखली येथे विद्यार्थ्यांशी संवाद साधत एसपी श्री तांबे म्हणाले की, नशेमुळे व्यक्तीचे आरोग्य, शिक्षण, करिअर, कुटुंब व सामाजिक जीवनावर गंभीर परिणाम होतात. त्यामुळे युवकांनी व्यसनाऐवजी खेळ, व्यायाम, योग, वाचन आणि समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सहभागी होऊन निरोगी व जबाबदार नागरिक बनावे. युवकांना कोणत्याही प्रकारच्या नशेपासून दूर राहण्याचे आवाहन केले. ''नशेमुक्त युवक – सुरक्षित समाज'' हा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला. या रनिंग स्पर्धेत गुड मॉर्निंग ग्रुप, चिखली, हिट ग्रुप, चिखली, स्वप्नपूर्ती अकॅडमी, चिखली, एनसीसीचे विद्यार्थी, शहरातील पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक तसेच मोठ्या संख्येने युवक व नागरिक सहभागी झाले होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन पोलीस स्टेशन चिखलीचे पोलीस निरीक्षक भूषण गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सहभागी संस्था, स्वयंसेवक व नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले. बुलढाणा पोलीस दलाचे 'मिशन परिवर्तन' अभियान युवकांना व्यसनमुक्त, सुदृढ व जबाबदार नागरिक घडविणे तसेच पोलीस व समाज यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणे या उद्देशाने सातत्याने विविध जनजागृतीपर उपक्रम राबवत असून, भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम सुरू राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# अधिकाऱ्यांना पुरस्कार तर कर्मचाऱ्यांची उपासमार

**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** महाराष्ट्र राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्हा आणि तालुकास्तरावर काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मागील आठ महिन्यापासून मानधन झालेले नाही. सदर मानधन निधी राज्यावर उपलब्ध असूनही अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. या कर्मचाऱ्यांच्याच उत्कृष्ट कामामुळे संबंधित अधिकारी पुरस्कार घेत आहेत. आणि हे कर्मचारी मागील आठ महिन्याप–ासून उपाशी मरत आहे.

त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांनी २३ जुलैपासून आपापल्या जिल्हा परिषद मध्ये काम बंद आंदोलन सुरू केले आहे. जर ३ ऑगस्ट पूर्वी सर्वांचे मानधन झाले नाही तर हे कर्मचारी मोठ्या संख्येने मुंबईत आझाद मैदानावर धडकणार आहेत.

महाराष्ट्र राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात सुमारे मागील वीस वर्षापासून कंत्राटी कर्मचारी अहोरात्र मेहनत घेत आहेत. वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये, स्पर्धांमध्ये महाराष्ट्राला देशामध्ये मानसन्मान मिळवून देण्यासाठी या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आपला उमेदीचा काळ वाया घातला आहे. अहोरात्र मेहनत करून कुठल्याही फार सोयी सुविधांची तमा न बाळगता आहे त्या सोयी सुविधांचा वापर करून तुटपुंजे मानधन घेऊन या कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र राज्याला नावलौकिक मिळवून दिला आहे. याचाच एक भाग म्हणून राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे अतिरिक्त अभियान संचालक स्वच्छ भारत मिशन शेखर रौंदळ यांचा स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२६ मध्ये उत्कृष्ट काम झाल्याबद्दल मुख्यमंत्री यांच्या हस्ते पंढरपूर येथे आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला सन्मान झाला आहे. परंतु ज्या कर्मचाऱ्यांच्या कामामुळे, ज्यांनी घेतलेल्या अहोरात्र मेहनतीमुळे हा पुरस्कार मिळाला आहे, त्या कर्मचाऱ्यांचे मात्र मागील आठ महिन्यापासून मानधन थकीत आहे. ही अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याचे सदर कर्मचाऱ्यांनी मत व्यक्त केले आहे. एकीकडे अधिकाऱ्यांना पुरस्कार तर कर्मचाऱ्यांची उपासमार असे विरोधाभाषिक चित्र निर्माण झाले आहे. तरी तात्काळ सदर कर्मचाऱ्यांचे मानधन व्हावे यासाठी आपापल्या जिल्हा परिषद मध्ये सदर कर्मचारी काम बंद आंदोलन करत आहेत. जर ३ ऑगस्ट पर्यंत जर मानधन जमा झाले नाही तर हे कर्मचारी मोठ्या संख्येने मुंबईतील आझाद मैदान येथे धडकून आंदोलन करणार आहेत. जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशनचा मानधनाचा निधी राज्यस्तरावर प्राप्त होऊनही संबंधित अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे सदर कर्मचाऱ्यांना अद्यापही मानधन मिळाले नाही हे अत्यंत खेदाची बाब आहे. कर्मचाऱ्यांचा दिवसेंदिवस असंतोष वाढत चालला आहे. तरी यावर सरकारकडून काय निर्णय होतो याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## ज्ञानगंगा अभयारण्यात व्याघ्र अधिवास बळकटकरण

# ताडोबाहून 'मोना'चे यशस्वी स्थलांतर



**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यात व्याघ्र अधिवास विकसित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, दिनांक २७ जुलै २०२६ ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प (TATR) येथून T163- FS1F वाघीणीचे यशस्वी स्थलांतर करण्यात आले आहे. सदर वाघीणीला ज्ञानगंगा अभयारण्यातील परिसरात यापूर्वी वास्तव्य करणाऱ्या PKT 1CP1 या नर वाघाच्या जोडीदाराच्या स्वरूपात सोडण्यात आले आहे.

व्याघ्र संवर्धन, नैसर्गिक प्रजननास चालना तसेच ज्ञानगंगा अभयारण्यातील व्याघ्र अधिवास अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ही कार्यवाही करण्यात आली. सर्व आवश्यक वैज्ञानिक व पशुवैद्यकीय निकषांचे पालन करून वाघीणीचे सुरक्षित स्थलांतर करण्यात आले आणि त्यानंतर तिला नियोजित अधिवासात यशस्वीरित्या मुक्त करण्यात आले.

या संपूर्ण मोहिमेत चंद्रशेखरन बाला वनसंरक्षक मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती यांचे मार्गदर्शनात यशवंत नागुलवार विभागीय वन अधिकारी(वन्यजीव) यांच्या सहाय्यक वनसंरक्षक चेतन राठोड, वनपरिक्षेत्र अधिकारी दिपेश लोखंडे (खामगाव), वनपरिक्षेत्र अधिकारी प्रकाश सावळे (बुलढाणा), वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे (अकोला) यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

तसेच ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे, शूटर अजय मराठे व त्यांची तज्ज्ञ चमू, तसेच ज्ञानगंगा अभयारण्यातील सर्व वनपाल सर्व मुळे, वानखेडे, राजपूत, राठोड, वसु व वनरक्षक भालेराव, उबरहंडे, देवकर, वनरक्षक व वनकर्मचारी वनमजूर यांनी या संपूर्ण स्थलांतर मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

वाघीणीला व्याघ्र अधिवासात मुक्त करण्याच्या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर हे देखील उपस्थित होते. त्यांनी वन विभागाच्या या संवर्धनात्मक उपक्रमाचे कौतुक करत, ज्ञानगंगा अभयारण्यामध्ये व्याघ्र संवर्धनासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना शुभेच्छा दिल्या.

ज्ञानगंगा अभयारण्यात वाघीणीच्या आगमनामुळे येथील व्याघ्र अधिवास अधिक समृद्ध होण्यास मदत होणार असून, भविष्यात नैसर्गिक प्रजननास चालना मिळून या परिसरातील वाघांची संख्या वाढण्यास हातभार लागेल, अशी अपेक्षा वन विभागाने व्यक्त केली आहे.

# सामाजिक न्याय आघाडीच्या उपजिल्हाप्रमुखपदी मिलिंद गवई



**मोताळा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या सामाजिक न्याय आघाडीच्या बुलढाणा उपजिल्हाप्रमुखपदी चिंचपूर येथील मिलिंद गवई यांची नियुक्ती करण्यात आली. बुलढाणा येथील गर्दे हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

सामाजिक व जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने काम केल्याची दखल घेत ही जबाबदारी सोपविण्यात आल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले. नियुक्तीनंतर गवई यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राज्य प्रवक्त्या जयश्रीताई शेळके, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांच्यासह वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले. पक्ष संघटना बळकट करण्याबरोबरच वंचित व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी त्यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या जयश्रीताई शेळके, बुलढाणा जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत तसेच पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेतृत्व व पक्षाने दिलेला सन्मान हा माझ्यासाठी प्रेरणादायी असून, या विश्वासाचे रूपांतर अधिकाधिक सामाजिक कार्य आणि संघटन बळकटीत करून दाखविण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेन, असेही त्यांनी सांगितले.

# पाणीपुरवठा योजनेची मोटार चोरीला

**जळगाव जामोद, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील जामोद येथील श्री महाकालेश्वर संस्थानच्या पाणीपुरवठा योजनेतील विहिरीत बसविलेली मोटार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संस्थानचे अध्यक्ष दीपक गजानन वानखेडे यांनी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. सन २०२३ मध्ये भाविकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी संस्थानने विहिरीत मोटार बसविली होती. शुक्रवारी (दि. २४ जुलै) सकाळी सुमारे नऊ वाजता मोटार जागेवर नसल्याचे निदर्शनास आले.



# निष्ठावंतानो चिंता करू नका, येणारा काळ उद्धव ठाकरेंचाच : बुधवत

## रामंमंदिरातील चोरीच्या पापाची परतफेड भाजपला करावीच लागेल : जयश्रीताई शेळके



**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** नीट पेपर फुटी प्रकरणात न्याय आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यांवर मोदी सरकारने दिल्लीत निर्दयीपणे लाठीहल्ला केला. या विद्यार्थ्यांच्या पाठीशी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे खंबीरपणे उभे राहिले. जवळपास महिनाभर चाललेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनासमोर अखेर केंद्र सरकार झुकले. देशभरामध्ये एक वेगळं वातावरण यामुळे निर्माण झाले आहे. रात्र झाली की पुन्हा दिवस उगवतो. कुणीही येथे सत्तेचा अमर पट्टा लावून आलेला नाही. त्यामुळे निष्ठावंतांनी चिंता करण्याची गरज नाही, येणारा काळ हा उद्धव ठाकरेंचा आणि निष्ठावंत शिवसैनिकांचा राहणार आहे, असे प्रतिपादन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी केले.

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेनेच्या वतीने विविध कार्यक्रम राबविण्यात आले. उद्धव ठाकरे साहेबांच्या उदंड व निरोगी आयुष्यासाठी बुलढाण्याचे ग्राम दैवत असलेल्या जगदंबा देवीला पातळ चढवून महाआरती करण्यात आली. तत्पूर्वी २४ जुलै रोजी शेतकऱ्यांना मोफत वृक्ष वाटप आणि बुलढाणा तालुक्यातील ग्रामीण भागात वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. जिल्हा परिषद शाळेतील ५ हजार विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. २६ जुलैला सकाळी सामान्य रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप, मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले. त्यानंतर बुलढाणा येथील गर्दे वाचनाच्या सभागृहात रक्तदान शिबिर घेण्यात आले. दरम्यान गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि कार्यकर्त्यांसोबत संवाद मेळावा देखील पार पडला.



यावेळी प्रवक्ता जयश्रीताई शेळके, सहसंपर्क प्रमुख डी. एस. लहाने सर, जिल्हा समन्वयक गजानन धांडे, उपजिल्हा प्रमुख लखन गाडेकर, विधानसभा संघटक सुनील घाटे, बुलढाणा तालुका प्रमुख विजय इतवारे, मोताळा तालुकाप्रमुख विजय इंगळे, गजानन उबरहंडे, महिला आघाडीच्या प्रतीक्षा पिंपळे, सह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत म्हणाले की, शिवसेनेमुळे सामान्य माणसाला सत्ता पदे मिळाली. उद्धव ठाकरे हे सरळ स्वभावाचा राजकारणातील देव माणूस आहे. गोरगरिबांच्या न्यायासाठी शिवसेना काम करत असते. सत्ता येत जात असते. शिवसेनेचा जन्म कधीही सत्तेसाठी झालेला नाही. निष्ठावंतांचा आजचा मेळावा येणाऱ्या काळामध्ये संघटनेला नवी ऊर्जा देणारा ठरणार आहे. सुरू असलेल्या या एसआयआर मध्ये आपला बूथ, आपलं गाव काळजीपूर्वक सांभाळून मतदारांचे अर्ज बीएलओ यांच्याकडून कडून भरून घ्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने आपल्याला अधिक जोमाने कामाला लागायचे आहे असे आवाहन देखील जालिंदर बुधवत यांनी केले.

शिवसेना ही संघर्षावर उभी राहिली आहे. शेतकरी ,बेरोजगार, उद्योग आणि सामान्यांच्या प्रश्नावर शिवसेना कायम लढा उभारत आली आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांचा समाज हिताचा विचार पुढे नेऊन तळागाळातील लोकांना न्याय देण्याचं काम उद्धव ठाकरे यांच्या माध्यमातून सुरू आहे. उद्धव ठाकरेंनी शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफी ही सरसकट दिली होती. दिलेला शब्द कर्तव्य निष्ठेने पाळणारा हा माणूस असल्याचे सहसंपर्कप्रमुख डी. एस. लहाने सर म्हणाले.



प्रभू श्रीरामचंद्र यांच्या नावावर राजकारण करून सत्तेत आलेल्या भाजप सरकारला कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या अयोध्येतील राम मंदिरातील चोरी प्रकरणातील पापाची परतफेड करावीच लागणार आहे असा घणाघाती हल्ला राज्य प्रवक्ता जयश्रीताई शेळके यांनी यावेळी केला. उद्धव ठाकरेंनी कोरोना सारख्या काळामध्ये कुटुंबप्रमुख म्हणून महाराष्ट्र सांभाळला. सहा खासदारांनी गद्दारी केली. त्यांच्या मतदारसंघात उद्धव ठाकरेंनी केलेला दौरा निष्ठेची ताकद दाखवून गेला आहे. आज महाराष्ट्रात देखील गुन्हेगारीचे प्रमाण वाढल आहे. सामाजिक काम करणाऱ्यांना आणि पत्रकारांना देखील धमकवल्या जात आहे. तरुणाई मध्ये सरकारबद्दल धगधगता असंतोष आहे. जंतर मंतर वरील आंदोलनात तरुणांच रक्त लाठीहल्ल्यामध्ये रस्त्यावर सांडले गेले. या आंदोलनाला उद्धव ठाकरेंनी क्षणाचाही विलंब न करता पाठिंबा दिला. तरुणाईच्या आंदोलनापुढे केंद्र सरकार झुकले. त्यामुळे केंद्र सरकारच्या सत्तेचा उलट्या गिनतीचा काळ सुरू झाला आहे, असेही जयश्रीताई शेळके म्हणाल्या.




दिल्लीतील जंतर-मंतर वरील आंदोलनामुळे हिम्मत हारू नका. कुणीही अजेय नाही ही भावना जनमानसामध्ये बळावली आहे. या विद्यार्थ्यांवर कुठलीही ईडी, सीबीआय चालू शकत नाही. त्यामुळे प्रधानांना राजीनामा द्यावा लागला. अन्यायाच्या विरुद्ध सगळ्यात पहिले मातोश्रीच्या आदेशावरून शिवसेना धावून जाते. या विद्यार्थ्यांच्या पाठीशी देखील उद्धव ठाकरे हेच पहिल्यांदा उभे राहिले. उद्धव ठाकरेंच्या रूपाने परिपक्व, संयमी नेतृत्वाला पुन्हा एकदा राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर बसवण्यासाठी आपल्या सगळ्यांना काम करावे लागणार आहे असे गजानन धांडे म्हणाले. किसान सेनेचे उपजिल्हाप्रमुख गजानन उबरहंडे यांनी देखील महाविकास आघाडीच्या काळातील उद्धव ठाकरे साहेबांनी दिलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची आठवण याप्रसंगी करून दिली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

प्रस्ताविक लखन गाडेकर यांनी केले. बाहेर सुरू असलेल्या भर पावसातही गर्दे सभागृह निष्ठावंत शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भरगच्च होता.

## खुरमपूर जिल्हा परिषद शाळेत सांप्रदायिक बाल दिंडी आणि वृक्षारोपण उत्साहात



**लोणार, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** देऊळगाव कुंडपाळ केन्द्र अंतर्गत असलेल्या जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा खुरमपूर येथे २५ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्त संत परंपरेचे जतन करणारा तसेच ज्ञान व भक्ती यांचा सुरेख संगम घालणारा सांप्रदायिक बाल दिंडी आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी अनेक विद्यार्थी वारकऱ्यांच्या पारंपारिक वेशभूषेत उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी संत परंपरेतील फुगडी, अभंग गायन यांची सुंदर प्रात्यक्षिके सादर केली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर राठोड सरपंच शिवशंकर भाग्यवंत उपसरपंच राहुल चव्हाण शाळेचे मुख्याध्यापक राठोड सर सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. सांप्रदायिक बाल दिंडी बरोबर वृक्षदिंडी काढून वृक्ष संवर्धनाचा ही संदेश विद्यार्थ्यांनी गावातून दिला. या कार्यक्रमासाठी सर्व शालेय विद्यार्थी गावातील नागरिक, शाळेचे शिक्षक वृंद शंकर दुगमवार , प्रकाश ऐनलावार, विलास आढाव, विठ्ठल चाटे, नितीन हुंबाड संजय नेवरे, केशव चोंडे अंशकालीन निदेशक श्रीहरि पांढरे, विठ्ठल चव्हाण, तुकाराम जाधव उपस्थित होते.

## युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये भक्तिमय पालखी सोहळा




**खामगाव, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** आषाढी एकादशीनिमित्त युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये भक्तिमय वातावरणात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विठ्ठलनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि दिंडीमुळे शाळा परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल व रुक्मिणीची वेशभूषा साकारत आकर्षक सादरीकरण केले. इयत्ता चौथी, पाचवी व आठवीच्या विद्यार्थिनींनी भक्तिमय नृत्य सादर केले. ज्ञानोबा-तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठलच्या जयघोषात पालखीची परिक्रमा काढण्यात आली. कार्यक्रमाला अध्यक्ष गोपाल अग्रवाल, संचालिका अंजलीताई अग्रवाल, प्राचार्य अनिरुद्ध अवचार, उपप्राचार्या अंकिता राठी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. विठ्ठल-रुक्मिणी मूर्तींचे पूजन करून त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. सामूहिक आरती, पसायदान व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## संतांच्या विचारातुन चिमुकल्यांना सापडली निसर्ग संवर्धनाची वाट



**बुलढाणा, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** वनविभाग बुलढाणा, स्वरसाधना संगीत विद्यालय आणि मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी निमीत्याने वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.लहानपणीच मुलांवर निसर्ग संवर्धनाचे संस्कार व्हावेत या उद्देशाने व आषाढी एकादशीच्या निमित्ताने या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे वनविभाग बुलढाणा स्वरसाधना संगीत विद्यालय आणि मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते.

मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. वैशाली गजेंद्र निकम यांच्या संकल्पनेतून आणि बुलढाणा उपवनसंरक्षक जमीर मुनीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्वर साधना संगीत विद्यालयाची संचालक अरविंद टाकळकर यांच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात संत साहित्यातील निसर्ग या विषयावर आधारित विविध संतांच्या पद्य रचना मुलांनी संतांची वेशभूषा करून सादर केल्या.तर कुणी वारकरी बनून तर कुणी पक्ष्यांच्या रुपात येऊन निसर्गाच्या वाटेवर चालण्याचा संदेश दिला. काही मुलांनी गाऊन सादरीकरण केले. त्यांना हार्मोनियम वर स्वर साधना संगीत विद्यालयाचे संचालक अरविंद टाकळकर तर तबल्यावर विवेक सोनुने यांनी साथ दिली.

चिमुकल्यांच्या सादरीकरणाने उपस्थित सर्वांची मने जिंकून घेतली. संत सावतामाळी यांचे

*कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी,*

*जनाबाईंचा पक्षी जाय दिगंतरा,*

*तर संत चोखामेळा ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा...*

अशा अनेक रचनांमधून निसर्गाच्या विविध घटकांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर अक्कादेवी महादेवी, संत कबीर यासारख्या भारतभरातील संतांच्या रचनांमधून निसर्गाची रुपे उलगडण्यात आली. पर्यावरणावर आधारित या कार्यक्रमाचे पूजा बिल्लारी यांनी बनवलेले पर्यावरण पूरक असे बॅनर कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

लहानपणीच मुलांना आपल्या पर्यावरण पूरक संस्कृतीची ओळख व्हावी व निसर्गाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात डॉ. वैशाली निकम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अद्वैत टाकळकर, क्षितिज निकम, वेदश्री साबळे, सई वानखेडे व समर्थ विनोद भुसारी यांनी तर आभार प्रदर्शन शलाका शाम पवार हिने केले.

सादरीकरणानंतर मुलांची वृक्षदिंडी काढण्यात आली व सोबतच मुलांच्या हस्ते वृक्षारोपण व बिजारोपणही करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ गजेंद्र निकम, श्रद्धा पवार आदींनी मेहनत घेतली.

## संज्योत खंडारे टॅलेंट सर्च परीक्षेत राज्यात प्रथम



**खामगाव, २८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील काळेगाव येथील संज्योत संतोष खंडारे , यांची भारत टॅलेंट सर्च परीक्षेत महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त करून भारतातील नामांकित संस्था इसरो बंगलोर येथे सहली साठी निवड झाली.

सदर विद्यार्थी एंझोकेम हायस्कूल येवला, येथे ८ या वर्गात शिकत आहें.संज्योत हा, काळेगाव येथील श्रीकृष्ण तोताराम खंडारे, मुख्याध्यापक यांच्या लहान्या बंधुचा मुलगा असून, वाडी येथील संतोष चव्हाण व अंतरज येथील संगम वानखडे व सागर वानखडे यांचा तो भाचा आहे संज्योत ने सांगितले की भविष्यामध्ये उच्चशिक्षित होऊन देशसेवा आणि समाजसेवा कार्य करण्याचा माझा संकल्प आहे. सदर यशाबद्दल संज्योत चे खामगांव तालुक्यात सर्वत्र कौतुक होत असून त्यावर कौतूकाचा वर्षाव होत आहे.

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City
हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड चिखली, प्रो.प्रा. मोहित विजय गाडेकर, ता.चिखली जि. बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAMAR/2012/46689